सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

क्र. २३] सोमवार, दिनांक २५ मे २०२६ : ज्येष्ठ ४, शके १९४८ [किंमत ०.०० रु.]

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

भाग एक-अ छत्रपती संभाजीनगर विभाग

जिल्हाधिकारी नांदेड, यांजकडून

(नगरपरिषद प्रशासन विभाग)

जिल्हा नांदेड

नगरपंचायत नामनिर्देशित सदस्यांची नावे शासन राजपत्रात

प्रसिध्द करणे बाबत. (अर्धापूर व नायगांव नगरपंचायत)

वाचा :-

१) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ३४१ब-३.

२) महाराष्ट्र नगरपरिषदा आणि नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पध्दत) नियम, २०१०.

३) महाराष्ट्र नगरपरिषदा आणि नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पध्दत) (सुधारणा) नियम २०१२.

४) या कार्यालयाचे समक्रमांकित आदेश दिनांक १५/०५/२०२६.

५) मुख्याधिकारी, नगरपंचायत अर्धापूर यांचे पत्र जा. क्र./अनपं/ ११४९/२०२६, दि. २२/०५/२०२६.

६) मुख्याधिकारी, नगरपंचायत नायगांव यांचे पत्र जा. क्र.४५०/ न.प.ना./२०२६, दि. २२/०५/२०२६.

आदेश

क्र. २०२५/नपाप्र/का-१/टे-३/नप सानि/नाम.नि.नियुक्ती/सिआर-५४, दि. २२/०५/२०२६. :- ज्याअर्थी, उक्त वाचा १ ते ३ मधील तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३४१ब-३ नुसार वाचा क्र.४ अन्वये **अर्धापूर व नायगांव** नगरपंचायतीच्या नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी नियुक्त केलेल्या पिठासीन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी नांदेड व बिलोली यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२/०५/२०२६ रोजी पार पडलेल्या **अर्धापूर व नायगांव** नगरपंचायतीच्या विशेष सभेमध्ये नामनिर्दशित सदस्य नियुक्तीचा अहवाल मुख्याधिकारी नगरपंचायत **अर्धापूर व नायगांव** यांनी उक्त वाचा ५ व ६ अन्वये या कार्यालयास सादर केला आहे.

त्याअर्थी, मी राहुल कर्डिले, जिल्हाधिकारी नांदेड याद्वारे उक्त वाचा २ चे नियम ६ अन्वये प्राप्त अधिकारानुसार खालील प्रमाणे नगरपंचायतीच्या नावासमोर नमूद नियुक्त नामनिर्देशित सदस्यांची नावे प्रसिध्द करीत आहे.

अ.क्र.	नगरपंचायत	नियुक्त नामनिर्देशित सदस्याचे नांव
१	**अर्धापूर**	१) राजेश्वर लक्ष्मीकांत देशमुख
		२) डाढाळे अमोल साहेबराव
२	**नायगांव**	१) गणेश संतराम नायगांवकर
		२) सतिष दत्तात्रय लोकमनवार

दिनांक : २२/०५/२०२६.
ठिकाणः नांदेड.

(राहुल कर्डिले भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी नांदेड.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.